ज्ञानेश्वर गोविंद मगर
पीएच. डी. विद्यार्थी शिक्षणशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ

१

# परदेशी विद्यापीठांबाबत सखोल चर्चा व्हावी

खाजगीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पना आता मुळीच नवीन राहिलेल्या नाहीत. आता जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात याच संकल्पनांवर आधारित असलेल्या धोरणांचा अवलंब केला जात आहे. शिक्षण क्षेत्रदेखील याला अपवाद नाही यातूनच परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश द्यावा की नाही याविषयी विचारमंथन सुरू झालेले आहे.

जागतिकीकरणाची व्याप्ती आता शिक्षण क्षेत्रापर्यंत येऊन पोहोचली आहे. भारतदेखील गेल्या अनेक महिन्यांपासून या विषयाच्या संदर्भात उलटसुलट स्वरूपाची चर्चा होत आहे. त्यातही भारतातून उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सातत्याने वाढत असलेली संख्या आणि परदेशी विद्यापीठांना भारतीय शिक्षण क्षेत्रात प्रवेश द्यावा अथवा नाही या दोन विषयांवर सध्या संपूर्ण देशभरात अधिक प्रमाणात चर्चा सुरू आहे याच महिन्याच्या प्रारंभी एक मार्च रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबधीच्या एका विधेयकाच्या मसुद्याला मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे हा मुद्दा आता ऐरणीवर आलेला आहे.

या विषयावर आपल्या देशात दोन्हीही बाजूंकडून अगदी टोकाची मते व्यक्त केली जात आहेत. परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्त प्रवेश दिलाच पाहिजे असे एका गटाचे आग्रही मत आहे. तर असा निर्णय घेणे म्हणजे भारतीय शिक्षण व्यवस्थेलाच धोका निर्माण करण्यासारखे असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश करण्याची अनुमती देऊनये असे दुसऱ्या गटाचे आग्रही प्रतिपादन आहे. म्हणूनच या विषयासंबधीच्या प्रमुख पैलूंचा ऊहापोह करणे उचित ठरेल.

आपल्या देशात अद्यापही शैक्षणिक क्षेत्रावरील खर्च हा जणू 'अनुत्पादक स्वरूपाचाच खर्च' असल्याची भावना रूढ झाली असल्याचे अनुभवास येते. साहाजिकच भारतामध्ये शिक्षण क्षेत्रासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाची सातत्याने घसरत असलेली आकडेवारी विचारात घेतली की पदरी केवळ निराशाच येते.

यासंदर्भात, सन १९९५ च्या सुमारास 'युनेस्को' ने घोषित केलेल्या आकडेवारीचे स्मरण होणे अगदी अपरिहार्य ठरते. 'युनेस्को' ने घोषित केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात सन १९९५ मध्ये भारत सरकाच्यावतीने शिक्षणासाठी केला जात असलेला दरडोई खर्च केवळ दहा डॉलर्सपेक्षाही कमी होता. त्याचवेळी अमेरिकेमध्ये सरकारच्यावतीने शिक्षणासाठी केला जात असलेल्या दरडोई खर्च चौदाशे डॉलर्सइतका जास्त होता. ही तफावत किती मोठी होती याचा सहजपणे अंदाज करता येतो.

भारताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीमध्ये एकूण उत्पन्नाच्या १.२४ टक्के एवढा खर्च शिक्षणावर करण्यात आला होता. तथापि, आठव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत मात्र या प्रमाणात प्रचंड घसरण झाली आहे. त्यामध्ये शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण केवळ ०.३५ टक्के इतके अत्यल्प, किंवहुना, नगण्यच झालेले आहे. भारतात शासकीय शिक्षण संस्थांची परिस्थिती तर अक्षरश: दयनीय अशीच आहे त्यातूनही सरकारने शिक्षणविषयक आर्थिक तरतुदींमध्ये वाढ करण्याचा निणर्य घेतलाच, तर त्याचे पर्यवसान चलनवाढ आणि करवाढ होणार ही बाबही लक्षात घेण्यासारखी आहे.

या पार्श्वभूमीवर, शिक्षण क्षेत्राच्या खाजगीकरणाची

अनिवार्यता लक्षात घेण्याची नितांत आवश्यकता आहे. भारतातील शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करण्याच्यादृष्टीने भारतात शिक्षण क्षेत्रातदेखील खाजगी गुंतवणूक होणे आता अपरिहार्य ठरले आहे. अशी गुंतवणूक नेमकी कोणत्या प्रकारे करावी, ती भारतीय गुंतवणूकदारांकडून व्हावी की जागतिक गुंतवणूकदाराचाही या प्रक्रियेत सहभाग असावा हाच खरा कळीचा मुद्दा ठरलेला आहे. परदेशी विद्यापीठांना अथवा शिक्षण क्षेत्रातील परदेशी गुंतवणूकदारांना भारतीय शिक्षण क्षेत्रात प्रवेश द्यावा की नाही या मुद्यावरील दोन्हीही बाजूंची मते जाणून घेण्यासरखी आहेत.

### अनुकुल मते

भारतात परदेशी विद्यापीठे अथवा अन्य शिक्षण संस्थांना आवर्जून प्रवेश देण्यात यावा असे मत आग्रहाने मांडणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांनी आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ अनेक तर्क माडंले आहेत. मूलत: आपल्या देशात उच्च शिक्षणातील काही विषयांबाबतच्या मूलभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे कारणही याबावतीत सांगितले जाते.

दरवर्षी भारतातून उच्च शिक्षणासाठी हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी परदेशात जात असतात. किंबहुना ही संख्या प्रतिवर्षी वाढतच चाचली आहे. ही संख्या किती मोठी आहे हे लक्षात येण्यासाठी आकडेवारीबाबतचे एकच उदाहरण पुरेसे ठरावे. सन २००४-०५ या एकाच शैक्षणिक वर्षात अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये ८० हजार ४६६ भारतीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. याखेरीज अन्य एकंदर किमान आठ देशांमधील विद्यापीठांमध्ये अथवा तत्सम अन्य शिक्षण संस्थांमध्येही प्रवेश घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असल्याचे निदर्शनास आले आहे

परदेशी शिक्षण संस्थामध्ये एवढया मोठया संख्येने प्रवेश घेण्यामागे असलेला विद्यार्थ्यांचा एक महत्वाचा हेतूदेखील लक्षात घेण्यासारखा आहे. उच्च दर्जाच्या शिक्षणाची सुविधा हे त्यापैकी एक कारण असले तरीही त्या विद्यापीठातून भारतात परत आल्यानंतर अथवा परदेशातही अधिक वेतनासह नोकरी मिळण्याची खात्री हेही सर्वाधिक महत्त्वाचे कारण ठरले आहे.

म्हणून एवढया मोठया संख्येने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याऐवजी अशा शिक्षण संस्थांना तसेच विद्यापीठांना भारतात हेच दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी उपलब्ध करून देणे हे भारतीय विद्यार्थ्यांना अधिक सोयीचे ठरेल असेही या विषयाच्या समर्थकांचे मत आहे.

### प्रतिकूल मते

अर्थात मुळातच या संकल्पनेला कडाडून विरोध करण्याऱ्या शिक्षणतज्ज्ञांनीदेखील या विषयासंबंधीची आपली मते स्पष्टपणे नोंदविलेली आहेत. भारत हा जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्य आहे. त्यामुळे आपली सर्व सेवा क्षेत्रे जगातील अन्य देशांच्या प्रवेशासाठी मुक्त ठेवणे भारतावर बंधनकारक असल्याच्या गैरसमजातून असा निर्णय घेण्यात येत असल्याचा या विरोधकांचा आक्षेप आहे. वास्तविक पाहता या संघटनेतील अन्य देशांनी अद्याप अशा प्रकारचा निर्णय घेतलेला नाही याकडेही हे विरोधक सर्वांचे लक्ष वेधत आहेत.

याच भावनेतून भारत सरकारने जागतिक व्यापार संघटनेच्या जिनेव्हा येथील मुख्य कार्यालयाला ३० जुलै २००५ रोजी पाठविलेल्या पत्राकडेही लक्ष वेधण्यात येत आहे. सेवा क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या एकंदर १६१ विषयांपैकी ज्या निवडक विषयांचा प्रस्ताव आपल्या देशाने सादर केला आहे. त्यात शिक्षण क्षेत्राचाही समावेश करण्यात आला असून त्यालाच या सर्वांचा विरोध आहे.

परदेशी विद्यापीठांना अथवा तत्सम अन्य शिक्षण संस्थांना भारतात प्रवेश करण्याची अनुमती दिली गेल्यास शिक्षणाचे संपूर्णपणे व्यापारीकरण केले जाईल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. फारच कमी आणि सधन कुटुंबांमधील विद्यार्थी- विद्यार्थिनींना अशा विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणे शक्य होऊ शकेल. अन्य काही जणांना त्यासाठी फार मोठया रकमेचे कर्ज काढावे लागेल असे निदर्शनास आणण्यात येत आहे. अशा परिस्थितीत या विद्यापीठांमधून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांमध्ये सामाजिक

बांधिलकीच्या भावनेचा साधा लवलेशही असणार नाही. घेतलेले कर्ज शक्य तितक्या लवकर फेडण्यासाठी यापैकी अनेक जणांनी भ्रष्ट मार्गांचा अवलंब केल्यास त्यात नवल वाटण्यासारखे काहीही असणार नाही असेही सांगण्यात येत आहे

**सुवर्णमध्य गाठणे आवश्यक**

अशा परिस्थितीत या विषयासंबंधी उच्चस्तरीय सखोल विचारमंथन घडवून आणण्याची नितांत आवश्यकता प्रकर्षाने जाणवत आहे. सद्यस्थितीत या विषयाबाबतचा सुवर्णमध्ये गाठणे आवश्यक ठरले आहे. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. कोणत्याही क्षेत्रात निकोप स्पर्धा निर्माण झाल्याखेरीज त्या क्षेत्राची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही हा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी या क्षेत्रामध्येही निकोप स्पर्धा घडून येणे अत्यावश्यक आहे याविषयी तरी कोणाचेही दुमत असणार नाही.

अर्थात, या स्पर्धेचे स्वरूप नेमके कशा प्रकारचे असावे, याविषयी चर्चेला पूर्ण वाव आहेच. अमेरिकेप्रमाणेच भारतातदेखील ' चाचणी सेवा आणि प्रशिक्षण क्षेत्रा' मध्ये भारतानेही आपले प्राविण्य यापूर्वीच सिद्ध केलेले आहे. काही निवडक भारतीय विद्यापीठांना तसेच निवडक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांनादेखील जागतिक स्तरावर आपला ठसा उमटविण्यासाठी यापुढे सक्षम बनवावे लागेल.

यासंदर्भात एका उदाहरणाचा आवर्जून संदर्भ द्यावासा वाटतो. पुणे विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागाने आपल्या दर्जेदार अभ्यासक्रमाच्या आणि तदनुषंगिक अन्य सुविधांच्या बळावर जर्मनी, इटली आणि अन्य काही देशांमधील विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यात स्पृहणीय यश संपादन केले आहे. याखेरीज आशियाई-पॅसिफिक देशांमध्ये भारतातील व्यवस्थापन-अभ्यासविषयक संस्था विशेषत्वाने नावाजलेल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने आपल्याच देशातील काही नामांकित उद्योजकांनादेखील शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रेरित आणि प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला तर तो निश्चितच फलदायी ठरू शकेल. त्यासाठी काही पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही सरकारला स्वीकारावी लागेल. यादृष्टीने केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून प्रयत्न झाल्यास भारतीय शिक्षण क्षेत्राला एक वेगळा आयाम प्राप्त होईल यात कोणताही संदेह नाही..

## Quatation

Live as it you were to die tomorrow. Learn as if you were to live forever

**– Mahatma Gandhi**

Education is the most powerful weapon which you can use to change the world

**– Nelson Mandela**

The great air of education is not knowledge but action

**– Herbert Spencer**